विजेशी खेळणारा शास्त्रज्ञ

# चार्ल्स रुडॉल्फ



BVBK-0402922

सुधाकर प्रभु

बा.वा. २०२२
१५/३/९४

विज्ञानाच्या क्षेत्रात कुमारांच्या मनात प्रेरणा निर्माण करणारी एका शास्त्रज्ञाच्या विलक्षण जिद्दीची कथा

# विजेशी खेळणारा शास्त्रज्ञ
# चार्ल्स रुडॉल्फ

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
वा. क्र. 2022 दिनांक १५/३/९४
विषय बा.वा. क्र. ........

सुधाकर प्रभु

BVBK-0402922

सुरेश एजन्सी

**प्रकाशक**
गुलाबराव मारुतीराव कारले
सुरेश एजन्सी
२०५ शुक्रवार पेठ
पुणे २

© सुधाकर प्रभु

**प्रथमावृत्ती**
जानेवारी १९९४

**मुखपृष्ठ**
बुवा शेटे

**टाईपसेटिंग**
शैलेंद्र कारले
फिनिक्स ग्राफिक्स
२०५ शुक्रवार पेठ,
पुणे २

**मुद्रक**
बालोद्यान प्रेस
शुक्रवार पेठ, पुणे २

**किंमत २५ रुपये**

# अनुक्रम


१. जत्रेचा दिवस . . . . . . . . . . . . . . ५
२. अरेरे ! खेळणी फुटली . . . . . . . . . ८
३. खेळण्यांचा पुनर्जन्म . . . . . . . . . १३
४. अपघात . . . . . . . . . . . . . . १६
५. नवी जखम . . . . . . . . . . . . . २२
६. नव्या जगाच्या वाटेवर . . . . . . . . २६
७. तू परत जा . . . . . . . . . . . . . २९
८. तुझं वय तरी काय ? . . . . . . . . . ३२
९. नवे मित्र, नवा शोध . . . . . . . . . ३५
१०. तीन घरकुले . . . . . . . . . . . . . ४०
११. अखेरचा अपघात . . . . . . . . . . ४५
१२. वीज मुठीत आली . . . . . . . . . . ४९


❖

# १. जत्रेचा दिवस



तो जत्रेचा दिवस होता. जर्मनीतील ते ब्रेसला हे छोटेसे गाव त्या दिवशी आनंदाने वेडे झाले होते. वर्षातून एकदाच भरणारी ती जत्रा. प्रत्येक घरातील लहानमोठी माणसे जत्रेला जाण्यासाठी नटून-थटून तयार झाली होती.

आपल्या छोट्या मुलाला - चार्ल्सला घेऊन त्याचे वडील जत्रेला निघाले होते. चार्ल्स हा त्यांचा एकुलता एक मुलगा. दहा वर्षांचा चार्ल्स आपल्या वडिलांचे बोट धरून जत्रेला चालला होता. त्याच्या वडिलांनी

आज खास शिवून आणलेले सुंदर कपडे त्याच्या अंगावर चढविले होते. जत्रेचा आनंद त्याच्याही चेहऱ्यावरून ओसंडत होता.

रस्त्यातून जाणारी चार्ल्सच्या वयाची लहानमोठी मुले चार्ल्सकडे पाहून एकमेकांना खुणावीत, त्याच्याकडे पाहून एकमेकांना काहीतरी माहिती देत. चार्ल्सला मात्र त्याची मुळीच कल्पना नव्हती. जाणीव नव्हती. मोठ्या आनंदाने आपल्या वडिलांशी गप्पा मारीत, त्यांना वेगवेगळे प्रश्न विचारीत तो जत्रेला निघाला होता.

चार्ल्स जत्रेच्या जागी पोचला. ती मोठमोठी दुकाने, तिथला दिव्यांचा झगझगाट, तिथले चित्रविचित्र आवाज या साऱ्यांची चार्ल्सला खूपच गम्मत वाटली. आपल्या मोठमोठ्या डोळ्यांनी तो जत्रेतील तऱ्हेतऱ्हेची दुकाने पाही. वडिलांना प्रश्न विचारी. त्याचे वडील त्याच्या प्रत्येक प्रश्नाला उत्तर देत. जणू त्यांच्या लाडक्या चार्ल्ससाठीच ते जत्रेला आले होते. चार्ल्सला घेऊन ते एका खेळण्यांच्या दुकानाकडे गेले. चार्ल्सला खेळणी विकत घेऊन देण्यासाठी त्यांनी किती तरी दिवसांपासून पैसे साठविण्यास सुरुवात केली होती. आपल्या अपुऱ्या पगारातून त्यांनी वर्षभर थोडे थोडे पैसे साठवीत आणले होते. आपल्या लाडक्या चार्ल्सची हौस भागविण्यासाठी त्यांनी अधूनमधून स्वतःच्या पोटाला चिमटा घेतला होता. ते ज्या रेल्वेच्या कारखान्यात काम करायचे त्या कारखान्यात दुपारी न्याहारीसाठी मिळणारे पैसेही त्यांनी त्यासाठी अनेकदा वाचविले होते.

तऱ्हेतऱ्हेच्या खेळण्यांनी भरलेल्या एका दुकानापुढे ते आता उभे होते. मुलासाठी कोणती खेळणी निवडावीत याचा विचार करीत असतानाच मागून कोणीतरी हाक मारली म्हणून त्यांनी मागे वळून पाहिले. त्यांच्या कारखान्यातील कोणी ओळखीचा कामगार आपल्या मुलाबाळांना घेऊन त्या खेळण्यांच्या दुकानात आला होता.

''कुणासाठी खेळण्यांची खरेदी चाललीय् ?'' त्या कामगाराने चार्ल्सच्या वडिलांना विचारले.

''या माझ्या मुलासाठी - चार्ल्ससाठी. चार्ल्स, काकांना नमस्कार कर,'' चार्ल्सच्या पाठीवर थोपटीत चार्ल्सचे वडील म्हणाले.

चार्ल्सने आपल्या वडिलांच्या मित्राला नमस्कार केला. चार्ल्सकडे पाहून त्या कामगाराचा चेहरा कसातरीच झाला. चार्ल्सने केलेला नमस्कार त्याने कसाबसा स्वीकारला. ''बरं मग, येतो तर.'' असे म्हणत त्यांचा घाईघाईने निरोप घेत आपल्या मुलांना घेऊन तो कामगार निघून गेला. आपल्या मित्राची ही वागणूक चार्ल्सच्या वडिलांना मुळीच आवडली नाही. त्यांना फार वाईट वाटले.

चार्ल्सला पाहून प्रत्येकजण असाच वागे. चार्ल्सशी बोलण्याची उत्सुकता कोणीच दाखवीत नसे. चार्ल्सशी मैत्री करायची आतुरता त्याच्या वयाचीही मुले दाखवीत नसत. 'आपला मुलगा असाच एकाकी राहणार का ? आपल्या मुलाचं आयुष्य असंच एकाकी जाणार का ? चार्ल्सच्या वयाची मुलं कशी एकमेकांच्या संगतीत राहतात. एकमेकांच्या संगतीत खेळतात. पण माझ्या मुलाला कोणी खेळायला बोलवीत नाही. कोणीही त्याच्याशी मैत्री करायला येत नाही. का ? का ?' चार्ल्सच्या वडिलांचे मन आक्रंदून उठले. त्या भरल्या जत्रेत त्यांच्या डोळ्यांत अश्रू आले. आपल्या डोळ्यांतील अश्रूंना त्यांनी अशीच वाट करून दिली असती. पण - ''बाबा, मला ती खेळणी घेऊन द्याल ?'' या चार्ल्सच्या शब्दांनी ते भानावर आले. अश्रूंनी डबडबलेले आपले डोळे त्यांनी पुसले आणि खेळण्यांनी भरलेल्या त्या दुकानाकडे त्यांनी नजर वळविली.

❖

## □ २. अरेरे ! खेळणी फुटली

''बोल, चार्ल्स, काय हवं तुला या खेळण्यांतलं ?'' आपुलकीनं चार्ल्सच्या वडिलांनी चार्ल्सला विचारले.

चार्ल्सने आपले मोठाले, टपोरे डोळे साऱ्या खेळण्यांवरून फिरवले. कोपऱ्यातील रंगीबेरंगी प्राण्यांची चित्रे त्याला दिसली. त्यात कुत्रा, मांजर, अस्वल, उंदीर, ससा, सुसर, वाघ असे अनेक प्राणी दाटीवाटीने आणि खेळीमेळीने एकमेकांजवळ बसले होते. प्राण्यांची ती चित्रे सुंदर होती. बोलकी होती. त्याच्याजवळच अनेक बाहुलाबाहुलीची चित्रे होती. कोणी फुटबॉलशी खेळत होते. कोणी तोंडात धरून बाजा वाजवीत होते. कोणी पिस्तूल उडवीत होते. त्या खेळण्यांपलीकडे पुठ्ठ्याची सुंदर सुंदर घरे मांडली होती. चार्ल्सची नजर सर्वांवरून फिरली आणि परत त्या प्राण्यांच्या चित्रांवर स्थिर झाली. ''ती प्राण्यांची चित्रं हवीत मला,'' चार्ल्स आपल्या वडिलांना म्हणाला.

''हे घे पैसे. अन् दुकानदाराकडून तूच विकत घे ती चित्रं,'' चार्ल्सचे बाबा त्याला म्हणाले.

चार्ल्सने वडिलांकडून पैसे घेतले आणि तो समोरच्या मुलांच्या गर्दीत घुसला. दुकानदाराने एक वेळच त्याच्याकडे पाहिले. त्याच्या चेहऱ्यावर नापसंतीच्या आठ्या उमटल्या. दुकानदाराने त्याला पाहिले न पाहिल्यासारखे केले आणि दुसऱ्या मुलांकडे नजर वळविली.

कितीतरी वेळ हातात पैसे घेऊन चार्ल्स त्या खेळण्यांकडे पाहात

उभा होता. दुकानदार त्याच्या मागून आलेल्या मुलांना हवी ती खेळणी बांधून देत होता, पण खेळण्यांसाठी कधीचा ताटकळत राहिलेल्या चार्ल्सकडे पाहायला त्याला फुरसद नव्हती ! त्याचे वडील दुकानदाराची ही अन्यायी वागणूक पाहात होते. त्यांना मनातून त्याची चीड येत होती. रडवेला होऊन चार्ल्स त्या दुकानदाराची नजर आपल्याकडे कधी वळते याची वाट पाहात होता. चार्ल्सच्या आजूबाजूला असलेली मुले चार्ल्सकडे पाहात आणि एकदम बाजूला होत. त्यांच्या डोळ्यांतील आनंदी भाव झटकन नाहीसे होत. नापसंतीच्या आठ्या त्यांच्या चेहऱ्यावर एकदम उमटू लागत. चार्ल्सच्यामागे उभी राहिलेली दोन-तीन मुले एकदम म्हणाली, ''अरे, हे ध्यान काही इथून हलणार नाही. चला, आपण दुसऱ्या दुकानात जाऊ.''

ती मुले शेजारच्या दुकानात निघून गेली. दुकानदाराला वाटले, हा मुलगा इथेच उभा राहिला तर आपले गिऱ्हाईक जाईल. तो एकदम चार्ल्सवर खेकसला, ''काढ तुझे पैसे. बोल, काय हवंय् तुला ?''

''मला ती कोपऱ्यातली प्राण्यांची चित्रं द्या. हे घ्या पैसे ?'' चार्ल्सने पुढे केलेले पैसे दुकानदाराने मुकाट्याने घेतले. ''काय कटकट आहे,'' असे पुटपुटत त्याने ती सारी चित्रे खोक्यात बांधली आणि खोके चार्ल्सकडे दिले. खोके देताना देखील त्याने चार्ल्सकडे असे बघितले की, त्याच्या त्या नजरेची चार्ल्सलाही भीती वाटली. मघापासून चार्ल्सकडे आणि दुकानदाराकडे - त्याच्या या निर्दय व्यवहाराकडे पाहात मुकाटपणे उभे असलेले चार्ल्सचे वडील त्याच्या जवळ आले नि म्हणाले, ''चल चार्ल्स, खूप उशीर झालाय्. आपल्याला जत्रेतल्या अजून खूप गमती पाहायच्या आहेत. चल बेटा !''

चार्ल्स वडिलांबरोबर जाण्यासाठी वळला. जत्रेत खेळणी खरेदी करण्यासाठी आलेल्या मुलांमधील कोणी तरी एकजण कुत्सितपणे ओरडला, ''अरे, तो बघा कुबडा ! बघा तरी त्याचं ध्यान !''

तापलेल्या तेलासारखे ते शब्द चार्ल्सच्या कानात शिरले. त्याचे मन

कळवळले. खेळणी घेतलेला त्याचा हात थरथरला. त्याच्या हातातील ते खेळण्यांचे खोके खाली पडले. आतली मातीची खेळणी खळकन् फुटली. त्याचे डोळे भरून आले. त्याचेच नव्हे, तर त्याच्या वडिलांचेही. खेळणी फुटल्याचे दुःख चार्ल्सला जाणवत होते, तर आपल्या कुबड्या मुलाच्या यातनांनी चार्ल्सच्या वडिलांना दुःख होत होते. त्यांना माहीत होते की, आपला हा कुबडा पण गुणी मुलगा विलक्षण सोशिक आहे. चार्ल्स खरोखरीच सोशिक होता.

आपण सुंदर नाही, आपण धडधाकट नाही, पाठीला कुबड असलेले स्वतःचे शरीर अतिशय कुरूप आणि बेंगरूळ दिसते, हे चार्ल्स जाणत होता. आपल्याला झालेले दुःख पाहून आपले वडील कळवळतात, हेही चार्ल्सला माहीत होते. आपले दुःख तो वडिलांसमोर सहसा प्रगट करीत नसे. सबंध रस्त्यातून भोवतालचे लोक आपल्याकडे बघत आहेत, आपल्या बेंगरूळ रूपाला ते हसत आहेत, हे चार्ल्सला माहीत होते. पण तिकडे मनोमन दुर्लक्ष करून तो जत्रेला आला होता. त्याच्या बालमनाने खूप सहन केले होते. जत्रेला आलेल्या सर्वांनीच त्याच्या कुरूपतेचा कुबडेपणाचा तिरस्कार केला होता. हे सारे त्याने सहन केले होते. पण आता वडिलांनी दिलेली खेळणीही त्याला पारखी झाली होती. त्याच्या डोळ्यांत अनिवारपणे अश्रू दाटून आले.

होती-नव्हती तेवढी बचत एकत्र करून चार्ल्सच्या वडिलांनी चार्ल्सला खेळणी घेतली होती. चार्ल्सच्या वडिलांना चार्ल्सचे दुःख जाणवले. त्यांनी खिशात हात घातला. काही मोजकी नाणी त्यांच्या हाताला लागली. चार्ल्सला तिथेच उभा करून ते शेजारच्या दुकानात गेले. आपल्या खिशातल्या मोजक्या नाण्यांचा अंदाज घेत त्यांनी तिथल्या खेळण्यांवरून नजर फिरविली. एका कोपऱ्यात काही रंग उडालेले लहान-मोठे ठोकळे होते. चार्ल्सच्या वडिलांनी त्याची किंमत विचारली. दुकानदाराने सांगितलेली किंमत त्यांना परवडणारी नव्हती. स्वस्तात स्वस्त असे तेवढेच खेळणे चार्ल्ससाठी घ्यायचे त्यांच्या मनात होते पण तेही शक्य दिसेना. आत काय करावे ! हा असा विचार करीत

ते थोडा वेळ तिथेच उभे राहिले - एकटे, एकटे.

त्या गर्दीत या पिता-पुत्रांकडे आवर्जून पाहणारी आणखी एक व्यक्ती तिथे उभी होती. केव्हापासून ती चार्ल्सकडे पाहात होती. त्या व्यक्तीचे नाव होते कुमारी रोज. ती चार्ल्सची शिक्षिका होती. चार्ल्सचे मन जाणणारी त्या गावातील तेवढीच एक व्यक्ती होती. ती पुढे झाली. दुकानदाराला तिने त्या लाकडी ठोकळ्यांचे पुडके बांधायला सांगितले. विषण्ण मनःस्थितीत उभ्या असलेल्या चार्ल्सच्या वडिलांच्या हातात ते पुडके त्यांनी दिले नि त्या म्हणाल्या, ''हे चार्ल्सला द्या. तुमची भेट म्हणूनच द्या. विलक्षण स्वाभिमानी आणि गुणी आहे तुमचा मुलगा. त्याचा स्वाभिमान मला दुखवायचा नाही. उद्या भेटेन मी त्याला.'' चार्ल्सचे वडील काही बोलणार एवढ्यात रोजबाई झरकन् समोरच्या गर्दीत मिसळूनही गेल्या. चार्ल्सच्या वडिलांनी जवळच्या मोजक्या पैशांतून चार्ल्ससाठी व स्वतःसाठी लोणी लावलेले पावाचे तुकडे, केक व पेस्ट्री घेतली आणि ते घाईघाईने चार्ल्सकडे आले. चार्ल्सचा हात आपल्या हातात घेऊन ते जत्रेच्या गर्दीपासून मोकळ्या असलेल्या मैदानाकडे निघाले.

''बाबा, तुम्ही एकदा सरसाचे खडे आणले होते ते कुठं ठेवलेत हो ?'' एका रिकाम्या बाकावर बसता बसता चार्ल्सने विचारले.

''कशासाठी हवेत ते तुकडे तुला ?'' चार्ल्सच्या वडिलांनी त्याला विचारले.

''मला हवे आहेत ते,'' चार्ल्स म्हणाला.

''घरी गेल्यावर मी देईन हां तुला. माझ्या नेहमीच्या खोक्यात आहेत ते.'' चार्ल्सच्या वडिलांनी त्याला सांगितले. दोघांनीही त्या बाकावर बसून बरोबर आणलेले पावाचे तुकडे संपविले. जवळच्या नळावर पाणी पिऊन परत ते त्या बाकावर बसून राहिले.

''बाबा, माझी सगळी खेळणी फुटली असतील का हो ?'' चार्ल्सने विचारले.

''आपण घरी गेल्यावर ते खोकं उघडून पाहू. ते बघ, दारूकाम सुरू झालंय् !'' चार्ल्सचे वडील एकदम म्हणाले.

आकाशात उडणारे दारूकाम ते पाहू लागले. तेवढ्यात गर्दीत चुकलेले एक कुत्रे येऊन चार्ल्सच्या पायाशी बसले. ते दिसायला खूपच सुंदर होते. चार्ल्सने त्याला जवळ घेतले. ते प्रेमाने चार्ल्सचे हात चाटू लागले.

चार्ल्सच्या वडिलांनी त्या कुत्र्याला थोपटीत म्हटले, ''चार्ल्स, या दुनियेत माणसापेक्षा ही अबोल कुत्रीच अधिक प्रेमळ असतात. सहृदय असतात.''

''बाबा, या कुत्र्याला आपण घरी न्यायचं का ?'' चार्ल्सने विचारले.

''घरी नेऊ या, पण आपल्याला त्याला पाळता येणार नाही, त्याचा मालक या वेळी त्याला जत्रेत शोधीत असेल. उद्याच्या वर्तमानपत्रात कदाचित आपणाला त्याच्या मालकाचा पत्ता लागेल.''

दारूकाम संपले होते. चार्ल्स व त्याचे बाबा घरी निघाले. तो कुत्राही त्यांच्याबरोबर चालू लागला. रस्ताभर अंधार पसरला होता. चार्ल्सचे मन मात्र प्रकाशाने उजळावे तसे उजळले होते.

❖

# ☐ ३. खेळण्यांचा पुनर्जन्म

चार्ल्सचे वडील सकाळी कामावर निघून गेले. चार्ल्सला आज सुट्टी होती. त्याने कालची खेळण्यांची दोन्ही खोकी उघडायला घेतली.

सगळ्यात अगोदर त्याने मातीच्या खेळण्यांचे खोके उघडले. आतल्या सुंदर खेळण्यांचे तुकडे तुकडे झाले होते. वडिलांनी त्याला ती खेळणी फुटली असल्याचे रात्रीच सांगितले होते. चार्ल्सने हळुवार हातांनी ते सारे तुकडे समोर मांडले. अजमासाने त्याने प्राण्यांप्रमाणे ते तुकडे विभागले. हत्तीची तुटलेली सोंड त्याने हत्तीजवळ ठेवली. मोराचा फुललेला तुटलेला पिसारा त्याने मोरापाशी मांडला. कुत्र्याचा पाय ओळखून त्याने तो कुत्र्यासमोर मांडला. एक एक चित्र जवळ घेऊन, निरखून त्याने त्यांची वाटणी केली. सारी चित्रे आणि त्यांचे मोडून पडलेले हात, पाय, सोंड, नाक, कान, शेपट्या यांचा हिशोब लागताच त्याला खूप आनंद झाला. जवळच बसलेल्या कुत्र्याच्या पाठीवर थोपटून त्याने तो आनंद व्यक्त केला.

त्यानंतर मेजाखाली ठेवलेले आपल्या बाबांचे खोके त्याने पुढे ओढून उघडले. त्यात अनेक वस्तू होत्या. कानस, हातोडी, पॉलिश कागद, रंगाच्या डब्या, लहान-मोठे ब्रश यांनी ते खोके भरलेले होते. एक पिवळसर रंगाची मोठी ट्यूबही तिथे होती. चार्ल्सला आठवले, एकदा तुटलेल्या कपबशीचा कान त्याच्या बाबांनी त्या ट्यूबमधील पातळसर पदार्थाने चिकटविला होता. त्याचे डोळे आनंदाने आणखी मोठे झाले. त्या आनंदातच तो शीळ वाजवू लागला. आपला नवा मित्र

विलक्षण आनंदात आहे हे पाहून कुत्र्यानेही भुंकून आपला आनंद व्यक्त केला.

चार्ल्सने त्या खोक्यातून पॉलिश पेपर, रंगाच्या डब्या, ब्रश आणि ती पिवळी ट्यूब काढून घेतली. मोठ्या आवेशाने आणि उत्साहाने तो आता बैठक मारून बसला. त्याच्या भोवताली ती मोडकीतोडकी खेळणी पसरली होती. पलीकडे बसलेल्या कुत्र्याला त्याने ओढून जवळ घेतले. त्याचे डोके आपल्या आकाराने मोठ्या असलेल्या डोक्याशी घुसळले, त्याला मनसोक्त कुरवाळले आणि मनाशी काही तरी योजून निश्चयाने तो कामास लागला.

प्रथम मोडलेल्या खेळण्याचे हात, पाय, सोंड त्याने उचलली. जवळच्या पॉलिश पेपरने त्याने ते तुटलेले अवयव गुळगुळीत केले. त्यानंतर अवयव जोडावयाची जागाही त्याने तशीच घासून गुळगुळीत केली. एकामागे एक असे करीत त्याने प्रत्येक प्राण्याला पॉलिश पेपरने घासूनपुसून घेतले.

या कामात त्याचे दोन तास कसे गेले हे त्याला कळलेच नाही. आता मात्र त्याला सकाळपासून काही खाल्ले नसल्याची जाणीव झाली. त्याचे वडील कामावर जाताना त्याच्यासाठी नाश्ता तयार करून गेले होते. तो पलीकडच्या मेजाकडे आला. त्याच्या वडिलांनी पावाची सँडविच तयार करून ठेवली होती. कॉफीही तयार होती. आपल्या नव्या मित्राला बरोबर घेऊन त्याने न्याहारी आटोपली आणि तो परत कामाला बसला. आता त्याने ती चिकट द्रव असलेली ट्यूब हातात घेतली. त्यातील पिवळा चिकट द्रव तो खेळण्याच्या नेमक्या तुटलेल्या जागेवर लावू लागला. बघता बघता त्याने ते तुटलेले अवयव प्राण्यांना चिकटवून टाकले. त्याची मोडलेली सगळी खेळणी त्याने दुरुस्त करून टाकली. पण त्याने केलेले हे जोडणीचे काम कोणाच्या गळ्याशी, कोणाच्या खांद्याशी तर कोणाच्या पोटाशी दिसत होते. मुख्य म्हणजे ती खेळणी जोडकामाच्या फटीमुळे थोडी कुरूप वाटत होती. एखाद्याचा



कुरूपपणा त्याला किती त्रासदायक ठरतो हे चार्ल्स जाणत होता. त्याने मग खेळण्यांची तीही उणीव भरून काढायचे ठरविले.

त्याने खोक्यातील कानस उचलली आणि लाकडाचा एक लहानसा तुकडा घेऊन तो त्याच्यावर घासू लागला. त्या लाकडाचा बारीक भुसा खाली पडू लागला. लाकडावर कानस घासल्यावर त्यातून लाकडाचा भुसा खाली पडताना त्याने पाहिले होते. हवा तेवढा भुसा मिळाला याची खात्री होताच त्याने तो भुसा गोळा केला. नुकत्याच जोडलेल्या एकएका खेळण्याच्या जोडकाम केलेल्या फटीत त्याने तो भुसा भरला. द्रवपदार्थावर तो चिकटून बसला. जोडकामाच्या त्या फटी आता पार बुजून गेल्या.

चार्ल्सने आता रंगाच्या डब्या व ब्रश हातात घेतले व चित्राच्या रंगाप्रमाणे त्याने आपल्या मनानेच नवे रंग तयार केले. मग हळुवार हाताने त्याने त्या चिकटलेल्या भुशावर ते रंग लावले. मूळ रंगाशी चार्ल्सचे हे नवे रंगकाम एकजीव झाले. आपण ही फुटलेली खेळणी जोडली याचा केवढा अभिमान वाटला चार्ल्सला ! केवढा आनंद झाला त्याला ! जणू त्याने त्या निरुपयोगी ठरलेल्या खेळण्यांचा पुनर्जन्मच घडवून आणला होता. विलक्षण अभिमानाने चार्ल्स आपल्या खेळण्यांकडे पाहू लागला. ही खेळणी जोडलेली आहेत असे आता कोणी पैजेवरही सांगितले नसते. ❖

# ☐ ४. अपघात

आपल्या खेळण्यांच्या कौतुकात चार्ल्स किती वेळ गुंतला असता कोणास ठाऊक ! त्याने त्याच्या खोलीच्या मागच्या बंद खिडकीवर पंजांची स्पष्ट खरखर ऐकली, तसा तो भानावर आला. ''अरे ! बाबा यायची वेळ झाली वाटतं !'' असे म्हणत तो उठला आणि खिडकीकडे गेला. त्याने खिडकी उघडली. खिडकीवर ती नेहमीची मांजरी आपल्या दोन पिलांना घेऊन उभी होती.

''या मित्रांनो, आत या,'' चार्ल्स म्हणाला. गावातील बेवारशी कुत्री- मांजरे चार्ल्सला आपले मित्र वाटत. कुत्र्या-मांजरांशीच काय, पण कावळा-चिमणी अशा पक्ष्यांशीही चार्ल्सची मैत्री होती. पंख दुखावून दारात पडलेल्या कावळ्याची त्याने दोन दिवस मन लावून शुश्रूषा केली होती. मानवी मित्रांचे प्रेम न लाभलेला चार्ल्स या प्राण्यांच्या सहवासात रंगून जायचा. त्यांचे प्रेम मिळवायचा. त्यांना प्रेम द्यायचा.

चार्ल्सचे बाबा व चार्ल्स एकाच वेळी कारखान्यातून व शाळेतून घरी यायचे. दुपारचे जेवण दोघे एकत्र घ्यायचे. अशा एका दुपारी नुकतीच व्यालेली, भुकेने व्याकुळ झालेली एक मांजरी चार्ल्सच्या दारात आली. प्राणिवेड्या चार्ल्सने तिला कुरवाळले. तिला दूध पाजले. त्यानंतर मांजरी ठरल्या वेळी दूध वसूल करण्यासाठी तेथे दत्त म्हणून हजर व्हायची. पुढे काही दिवसांनी त्या मांजरीबरोबर तिची पिलेही येऊ

लागली.

''पण अजून बाबा कसे आले नाहीत ?'' चार्ल्स स्वतःशीच पुटपुटला.

तेवढ्यात आपली लांब लांब पावले टाकीत घराच्या दिशेने येणारे त्याचे बाबाच त्याला दिसले.

''आज तुम्हाला उशीर झाला. होय ना ?'' घरात शिरत असलेल्या वडिलांना त्याने प्रश्न केला.

''होय बेटा, या आपल्या नव्या मित्राचा पत्ता लागतो का याची चौकशी करण्यात वेळ गेला. आपल्या गावातल्या वर्तमानपत्रात या स्वारीची माहिती आली आहे. आज कारखाना सुटल्यावर मी याच्या मालकाला जाऊन भेटतो.''

तेवढ्यात त्यांचे लक्ष चार्ल्सने मांडलेल्या खेळण्यांकडे गेले. ''अरेच्या, ही कुठली खेळणी बुवा ?'' ते आश्चर्यातिरेकाने म्हणाले आणि घाईघाईने त्या खेळण्यांकडे गेले.

''ओळखीची वाटतात का ही खेळणी बाबा ?'' चार्ल्सने आपल्या बाबांना विचारले.

प्रत्येक खेळणे चार्ल्सच्या वडिलांनी उचलून घेऊन निरखून बघितले. भोवतालच्या रंगाच्या बाटल्या व ब्रश, तसेच चिकटविण्याच्या द्रवपदार्थांची ट्यूब वगैरे वस्तू बघून आपल्या मुलाची कामगिरी त्यांच्या लक्षात आली. चार्ल्सविषयी अभिमानाने आणि आनंदाने त्यांचा ऊर भरून आला. ''चार्ल्स ! माझ्या गुणी बाळा ! तुझा अभिमान वाटतो मला. किती गुणी आहेस बेटा !'' चार्ल्सच्या वडिलांचे डोळे आसवांनी भरून आले. ''माझी दृष्ट लागेल तुला.'' आपले डोळे पुशीत ते म्हणाले.

''बाबा, चला मी जेवणाची तयारी करतो. नाही तर तुम्हाला कामाला जायला उशीर होईल,'' चार्ल्स वडिलांना म्हणाला. त्याचे

वडील डोळे पुशीत हसले.

चार्ल्सने भराभर स्टोव्ह पेटविला. वडिलांनी येताना बटाटे आणले होते. त्याचे काप करून त्यांनी ते भराभर तव्यावर टाकले. चार्ल्सने टोमॅटोचे सूप तयार केले. वडिलांनी येताना पॅटीस आणली होती.

जेवायला बसण्याच्या अगोदर चार्ल्सने कुत्र्याला पाव कुस्करून दुधाबरोबर खायला घातला. मांजरीला आणि तिच्या पिलांना परत दूध घातले.

गप्पा मारीत दोघांनी जेवण केले. गप्पांचा विषय कुत्र्याचा मालक कोण असेल हाच होता. मध्येच चार्ल्स म्हणाला, ''बाबा, संध्याकाळी तुम्ही मालकाला घेऊन आलात तर त्यांच्या स्वागतासाठी घरात काय आहे ?''

''म्हणजे म्हणायचेय काय तुला ?'' चार्ल्सच्या वडिलांनी चार्ल्सला विचारले.

''बाबा या आपल्या मित्राचा मालक प्रथमच आपल्याकडे येणार. त्याच्या मालकाचं तोंड गोड केलं नाही तर आपल्या या छोट्या मित्राला काय वाटेल ? निदान काही नाही तरी थोडी पेस्ट्री तरी आणायची म्हणतो मी.''

''कळलं, बेटा कळलं. थोडक्यात आज तुला पेस्ट्री खायची लहर आलीय्. खरं ना ? ठीक आहे. आपल्या बेकरीतील खात्यावर थोडी पेस्ट्री मांडायला सांग. काय ? एखादा केकही बघ स्वस्तसा. आपल्या या छोट्या मित्राचा निरोपसमारंभ घडवून आणू आज आपण.''

जेवण आटपून चार्ल्सचे वडील कामाला निघून गेले.

चार्ल्स आता लाकडी ठोकळ्याचे दुसरे खोके घेऊन खेळायला बसला. सकाळपासून ते खोके उघडून पाहायलाही त्याला वेळ झाला नव्हता. चार्ल्सने ते खोके उघडले. त्यात रंग उडालेले रंगीबेरंगी ठोकळे होतेच, पण त्यांच्याखाली छोटी छोटी दारे, खिडक्या, तुळया असेही

साहित्य होते. शाळेत छंदाच्या तासाला त्याच्या बाईंनी असे साहित्य दाखवून एक सुंदर घरकुल तयार करून दाखविले होते. या खोक्यात तर घरकुलाचे साहित्य होतेच, पण शिवाय छोटा पूल, कठडे, दिव्यांचे खांब असेही काही साहित्य दिसत होते. 'आपण घरकुल तयार करायचे का ? आपल्याला जमेल का सारं ?' चार्ल्सने स्वत:लाच प्रश्न केला.

त्याने प्रथम ठोकळे, दारे, खिडक्या, छपराचे पुठ्ठे यांची विभागणी केली. वेगवेगळ्या रंगाच्या खिडक्यांवरून ते साहित्य एकापेक्षा अधिक घरकुलांचे असावे असे चार्ल्सला वाटले.

चार्ल्स ठोकळ्यावर ठोकळे रचू लागला. त्याने भिंती रचल्या. मधली दारे-खिडक्यांची रचना केली. त्याच्यावर तुळया टाकल्या. मग छप्पर बसविले. असे एक घरकुल तयार झाले. मग तसेच दुसरे घरकुल त्याने तयार केले. मग तिसरे. अशी तीन टुमदार घरे उभी राहिली. मग चार्ल्सने एका घरापुढे दिव्याचा खांब उभा केला. अजून बरेच साहित्य शिल्लक होते. पुलाच्या कठड्याचे काय करायचे याचा विचार चार्ल्स करू लागला.

तेवढ्यात त्याला कल्पना सुचली. 'या घरापुढे नदी केली तर ? पण नदी कशी बरं करायची ?' चार्ल्स विचार करू लागला. तेवढ्यात त्याचे ते टपोरे डोळे विलक्षण आनंदित झाले. ''जमलं !'' तो टाळी वाजवून स्वत:शीच ओरडला.

सकाळचा बराच भुसा शिल्लक होता. त्याने आणखी थोडा भुसा तयार केला. तो निळसर आकाशी रंगात ओला केला आणि बोटभर रुंदीच्या जागेत लांबलचक पसरला. झाले ! नदी तयार झाली. मग त्या नदीवर पुलाच्या कमानी उभ्या राहिल्या. मग कठडे खडे झाले.

चार्ल्सला खूपच आनंद झाला. बाहेर उन्हे ओसरू लागली. खोलीत अंधार दाटू लागला. चार्ल्सला वाटू लागले, आज पाहुणे घरी येतील तेव्हा संध्याकाळ झालेली असेल. आपले हे घरकुल तेव्हा अंधारात बुडून गेलेले असेल. 'घरात जसा दिवा लावतो तसा दिवा या घरकुलात

लावता आला तर ? आपल्या खोलीप्रमाणे ही घरकुलेही प्रकाशाने उजळून टाकता आली तर ?' त्याचे ते मोठे असलेले डोके कामाला लागले. टुण्णदिशी उडी मारून तो उठला. मघाच्या खोक्यातील छोट्या मेणबत्त्यांची त्याला आठवण झाली.

त्याने त्या मेणबत्त्या काढल्या आणि प्रत्येक घरकुलात त्या लावून ठेवल्या. ती उजळलेली घरकुले पाहून त्याचा आनंद मनात मावेना. घरकुलातील उजेड अधिक प्रकाशित व्हावा म्हणून त्याने खोलीची मागची व पुढची अशा दोन्ही खिडक्या बंद केल्या.

तेवढ्यात त्याला आठवले की, वडिलांनी सांगितल्याप्रमाणे पेस्ट्री आणि केक आणायला जायचे आहे. त्याने पैसे घेतले आणि तो बाहेर आला. त्याच्याबरोबर कुत्राही उठून बाहेर आला. मांजरीची पिले घरकुलाच्या जवळच शांत झोपली होती. कुलूप लावण्यासाठी दार ओढून घेताच मात्र मांजरीने टुणकन् उडी मारली आणि तीही बाहेर आली.

''बये, तू कुठं निघालीस ? थांब इथंच. आत्ता येतो आम्ही. केक आणतो तुझ्यासाठी !'' चार्ल्सने तिची समजूत घातली. ती मांजरी मग तिथे पायरीवरच थांबली. खोलीच्या बंद दारावर ती आपली नखे घाशीत तिथेच बसली.

चार्ल्स लागलीच परत निघाला. पेस्ट्री व केक घेऊन तो घराजवळ आला तेव्हा त्या मांजरीचे विलक्षण करुण आक्रंदन त्याच्या कानावर पडले. ती सारखी घरात घुसण्याचा प्रयत्न करीत होती, आणि अतिशय करुण आवाजात भेसूर ओरडत होती, तेवढ्यात कसला तरी जळका वास नाकात शिरल्यासारखे चार्ल्सला वाटले. त्याने घाईघाईने दार उघडले. धुराचा केवढा तरी भपकारा बाहेर आला. मांजरीने एकदम आत उडी टाकली आणि ती पिलांकडे धावली. चार्ल्स पुढे झाला. त्याला दिसले त्यावर त्याचा विश्वासच बसेना. त्याने उभारलेले घरकूल जळून भस्मसात झाले होते. घरकुलात लावलेल्या मेणबत्त्यांनी ते पेटले

होते. जवळच झोपलेली मांजरीची पिले त्या धगीने आणि धुराने घुसमटून मरून पडली होती. घरकुलाचे शेवटचे अवशेष अजूनही जळत होते. चार्ल्सला ते दृश्य पाहवेना. मांजरीचा करुण स्वर त्याच्याने ऐकवेना. त्याचे मस्तक सुन्न झाले. तो तसाच खुर्चीवर कोसळला.

''चार्ल्स, तुझ्या मित्राच्या मालकाचा पत्ता लागला पण भेट झाली नाही बाबा.'' बाहेरून आलेल्या वडिलांच्या शब्दांनी तो भानावर आला. चार्ल्स उठून एकदम वडिलांकडे धावला. त्याने वडिलांना मिठी मारली. मघापासून आवरून ठेवलेला त्याचा हुंदका एकदम बाहेर पडला.

वडिलांनी हळूहळू सारी माहिती विचारून घेतली. त्यांनी चार्ल्सची समजूत घातली. त्यांनी सारी खोली आवरली. पिलांना अंगणात पुरून टाकले.

रात्री थोडासा शांत झालेला चार्ल्स वडिलांना म्हणाला, ''उजेड मिळेल पण आगीचा धोका राहणार नाही, असे दिवे कधी तयार होतील का हो बाबा ?''

''चार्ल्स आता, मुकाटपणे झोपी जा बरं. कुठल्याही गोष्टीचा इतका विचार करू नये माणसानं,'' वडील थोडेसे रागावूनच त्याला म्हणाले.

❖

2022

## □ ५. नवी जखम

आपल्या कुत्र्याला न्यायला आलेला ऑस्कर म्हणाला, ''आमच्या या टॉमीनं दरवेळी मला नवा मित्र मिळवून दिलाय. माझ्यापेक्षा टॉमीची निवडच चांगली असते. असा माझा व माझ्या वडिलांचा पण अनुभव आहे.''

ऑस्करची आणि चार्ल्सची ओळख अशी झाली. ऑस्कर चार्ल्सहून थोडा मोठा होता. चार्ल्सशी तो प्रेमाने बोलला. टॉमीमुळे आयुष्यात आलेला हा नवा मित्र आपल्या आयुष्याला वळण लावणार आहे याची कल्पना त्या वेळी चार्ल्सला आणि त्याच्या वडिलांनाही आली नाही.

दर रविवारी चार्ल्सला भेटायला येणाऱ्या ऑस्करने कधी कोणी न दिलेले मित्रप्रेम चार्ल्सला दिले. चार्ल्सचे बेंगरूळ शरीर, त्याचे ते वाढत जाणारे कुबड याचा तिरस्कार कधीही ऑस्करच्या डोळ्यांत दिसला नाही. शरीराने अधू असलेल्या आपल्या मित्राजवळ कुशाग्र बुद्धिमत्ता आहे हे ऑस्कर जाणून होता. प्रत्येक विषयात पहिल्या येणाऱ्या चार्ल्सची बुद्धिमत्ता सारेजण जाणत होते. त्याचे शिक्षक नी त्याचे मित्र चार्ल्सच्या अचाट बुद्धिमत्तेने थक्क व्हायचे. त्याच्या वाढत जाणाऱ्या कुबडाबरोबर जणू काय त्याच्या बुद्धिसामर्थ्याला नवे नवे धुमारे फुटत होते. अंकगणित, बीजगणित, विज्ञान हे त्याचे हातखंडे विषय. फावल्या वेळात आपल्या वहीत आकड्यांशी खेळ खेळणारा चार्ल्स सर्वांना

अजब वाटायचा. ऑस्कर त्याच्या पुढे एक इयत्ता शिकत होता. पण ऑस्करला कठीण वाटणारी प्रमेये तो चुटकीसरशी सोडवून द्यायचा. परमेश्वराने त्याला शरीराची -रूपाची देणगी देण्यात कंजुषपणा केला होता खरा, पण बुद्धीचे वरदान त्याने चार्ल्सला आपल्या हजार हातांनी बहाल केले होते. भोवतालचे जग हे जाणत होते, मात्र सहानुभूतीचा शब्द चार्ल्सला द्यायला ते तयार नव्हते. चार्ल्सला आनंद देणारे जग वेगळे होते आकड्यांचे ! ते अबोल आकडेच काय ते त्याला हसवीत, रिझवीत.

त्या दिवशी ऑस्कर चार्ल्सकडे आला तो मुद्दाम त्याच्या वडिलांनाच भेटायला. डिप्लोमा म्हणजे पदविका परीक्षेत साऱ्या शहरात चार्ल्स पहिला आला होता.

त्याच्या वर्गमित्रांनी ''कुबड्यानं कमाल केली !'' या शब्दात हा आनंद व्यक्त केला होता. ''मला वाटतं, चार्ल्सची सारी बुद्धिमत्ता त्याच्या कुबडात साठवली असावी !'' त्याचे गणिताचे शिक्षक म्हणाले होते. त्या आनंदाच्या क्षणीही कोणी कोणीही त्याचे कुबड विसरायला तयार नव्हते. कधी मिळाला नव्हता एवढा मान शाळेला लाभला होता. पण रूपावर भाळणाऱ्या जगाला एवढा मोठा सन्मान एका कुबड्याने मिळविला आहे हे मनोमन आवडले नव्हते. त्याला मिळालेल्या थोर सन्मानाने चार्ल्स अधिक गंभीर झाला. त्याने निर्मिलेल्या आकड्यांच्या सृष्टीतच आता तो अधिकाधिक आपले मन रमवू लागला होता.

बरोबर आणलेले पुडके चार्ल्सच्या वडिलांसमोर ठेवीत ऑस्कर म्हणाला, ''काका, चार्ल्सला पदविकेचं प्रमाणपत्र घ्यायला जायचंय्. त्या वेळी नियमाप्रमाणं हा करड्या रंगाचा सूट घालायला पाहिजे. मी हा कपडा त्यासाठी आणलाय्. पण हा कपडा मी दिलाय हे त्याला सांगू नका. त्याला ते कधीही आवडणार नाही. तुम्ही तुमची भेट म्हणूनच हा कपडा त्याला द्या.''

गावातील शिंप्याने चार्ल्सच्या शरीराची सारी ठेवण लक्षात घेऊन

सूट शिवून दिला. ह्या सुटाने चार्ल्सचे कोणतेही व्यंग लपविले नाही की लपले नाही. त्याच्या खुज्या शरीरावरचे कुबड त्याच्या वर दिसणारे त्याचे ते आकाराने अधिक मोठे असलेले मस्तक, यामुळे तो सूट घालून पदविका प्रमाणपत्राच्या वितरण समारंभाला निघालेल्या चार्ल्सकडे पाहून प्रत्येकाने पोटभर हसूनच घेतले.

तो महाविद्यालयाच्या प्रवेशद्वाराशी आला. करड्या रंगाचे सूट घातलेले शेकडो विद्यार्थी तिथे हसतखिदळत होते. आतबाहेर जा-ये करीत होते. आनंदाला आणि उत्साहाला तिथे उधाण आले होते. महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारातून मुख्य इमारतीकडे येणारी चार्ल्सची बेंगरूळ मूर्ती पाहून त्यांना हसू आवरेना. त्यांनी एकमेकाला खुणावून भरपूर हसून घेतले. इमारतीपाशी जाऊन पोचलेल्या चार्ल्सला तेवढ्यात एकाने हटकले.



''चार्ल्स, आजच्या या गर्दीत तुझं काय काम ?''

''आज मी नसायचं तर कोणी असायचं ? प्रमाणपत्र वितरण समारंभासाठी आलोय् मी.'' चार्ल्सच्या स्वरात तीव्रता होती.

''म्हणजे सूचनाफलकावरील सूचना तू वाचलेली दिसत नाहीस. जा, जा, जरा नीट डोळे उघडून वाच,'' तो मुलगा कुर्च्यात म्हणाला.

चार्ल्स झपाट्याने आत गेला. सूचनाफलकाच्या दिशेनेच तो निघाला. 'कसली बरं सूचना असेल ?' त्याचे मन म्हणाले. तो सूचनाफलकाकडे आला. फलकावरील सूचना त्याने एकदा वाचली. दोनदा वाचली. डबडबलेल्या डोळ्यांनी तो परत परत ती सूचना वाचीत राहिला :

''चार्ल्स रुडॉल्फसारख्या अत्यंत हुषार असलेल्या मुलाला पदविका प्रमाणपत्र वितरण समारंभास उपस्थित राहण्याची गरज नाही. त्याचे प्रमाणपत्र त्याला घरीच मिळेल.''

फळ्यावरची ती अक्षरे खड्यासारखी त्याच्या मनाला खुपत होती. त्याच्या मनावर नव्या जखमा घडवीत होती

❖

# ☐ ६. नव्या जगाच्या वाटेवर

''चार्ल्स बेटा, रडू नकोस. ज्यांनी आज तुझ्यासारख्या कोवळ्या मुलाचा अपमान केला, त्यांची मनं निकोप नाहीत. देवानं तुला सदृढ शरीर दिलं नाही पण निकोप मन दिलंय हीच मोठी देणगी समज, बेटा !'' चार्ल्सची समजूत काढीत त्याचे वडील त्याला म्हणाले.

केवढ्या आनंदात ते सभागृहावर गेले होते. सन्मानित होणाऱ्या विद्यार्थ्यांत आपला चार्ल्स नाही हे पाहून त्यांना आश्चर्य वाटले. पण आश्चर्य वाटणाऱ्यांत केवळ चार्ल्सचे वडीलच नव्हते, तर ऑस्करही होता. चार्ल्सचे अभिनंदन करण्यासाठी केवढा मोठा गुच्छ घेऊन तो सभागृहात आला होता.

सभागृहातून घरी परत आलेल्या चार्ल्सने शांतपणे आपला नवा सूट आपल्या कुबड्या अंगावरून उतरविला. परत म्हणून अशा दिखाऊ पोषाखाच्या आणि पोषाखी जगाच्या भानगडीत पडणार नाही, अशी जणू प्रतिज्ञाच त्याने केली. वेळ आणि पैसा फुकट घालविण्यापलीकडे या उपद्व्यापाने काहीच साधले नाही हे तो मनोमन समजला. त्याने आपली गणिताची वही काढली आणि नवी नवी प्रमेये तो सोडवू लागला. ते आकडे त्याचे मन रिझवू लागले. त्या आकड्यांच्या नादात तो जग विसरला. क्षणापूर्वीचा अपमान पण विसरला.

सभागृहात चार्ल्स नाही हे पाहताच त्याचे वडील घरी निघून आले. त्यांच्यामागोमाग ऑस्करही आला. विद्यालयाची निर्दय वागणूक त्याला

कळली होती. आपल्या शिक्षकांशी भांडूनच तो चार्ल्सकडे आला होता. तो चार्ल्सला म्हणाला, "चार्ल्स, तुझं कौतुक करावं, तुला मोठा म्हणावं एवढ्या मोठ्या मनाचे हे लोक नाहीत. चार्ल्स, यांची मनं अगदी सडकीकुजकी आहे." मग तो एकदम चार्ल्सच्या वडिलांकडे वळून म्हणाला, "काका, मी आठ दिवसांनी अमेरिकेला जाणार आहे. चार्ल्सला माझ्याबरोबर पाठवा. या रत्नाची पारख करणारा जवाहिऱ्या या गावात तरी मला दिसत नाही !"

चार्ल्सशिवाय चार्ल्सच्या वडिलांना दुसरे कोणीच इतके जवळचे नव्हते. त्यांची माया काय ती एकट्या चार्ल्सवर एकवटली होती. त्या म्हाताऱ्याची सारी धडपड त्याच्या चार्ल्ससाठी होती. त्या थकल्याभागल्या शरीरातील सारी उमेद एकट्या चार्ल्ससाठी होती. लहानपणीच मातृसुखाला पारख्या झालेल्या चार्ल्सची आई होऊन त्यांनी त्याला वाढविले होते. चार्ल्सशिवाय त्यांनी दुसऱ्या कशाचाच विचार केला नव्हता. दिवसभराचे श्रम त्यांना चार्ल्समुळे सुसह्य वाटत. सकाळपासून संध्याकाळपर्यंत कामाने दमलेले शरीर संध्याकाळी चार्ल्सची भेट होणार म्हणून सुखावून जाई. ऑस्करने अचानक विचारलेल्या या प्रश्नाने त्यांचे वेडे पितृमन गोंधळून गेले, बावरून गेले.

शेवटी त्यांनी आपले मन घट्ट केले. चार्ल्सला अमेरिकेत जावयाची परवानगी दिली. उलट पितृवेड्या चार्ल्सचीच त्यांना समजूत काढावी लागली. ऑस्करने त्याच्यासाठी त्याच्या मामांनी पहिल्या वर्गाच्या तिकिटासाठी पाठविलेल्या पैशांतून दोन तिसऱ्या वर्गाची तिकिटे काढली. आपली योजना त्याने कोणालाही कळू दिली नाही. या केवळ रूपावर भाळणाऱ्या जगात आपला हा त्याग घरातील माणसांना आवडणार नाही, हे तो पक्के जाणून होता. त्यासाठी त्याने हजार लटपटी केल्या. चार्ल्स मानी आहे हे तो जाणत होता. त्यामुळे त्याचा स्वाभिमान दुखावणार नाही अशा रीतीनेच ऑस्करला आपल्या थोर मित्रावर हे उपकार नकळत करावयाचे होते. ऑस्करची धडपड पाहून चार्ल्सच्या वडिलांचे हृदय राहून राहून भरून येत होते.

चार्ल्स मात्र या जगाच्या उपेक्षेपासून दूर होता, खूप दूर होता. आपल्या आकड्यात, आकड्यांच्या गणितात तो स्वतःला रमवीत होता. त्याचे नाव संशोधकांच्या जगात चर्चिले जावे अशी एक घटना मात्र तेवढ्यात घडली. चार्ल्सने नव्यानेच लोकप्रिय होणाऱ्या विजेच्या उपयोगाबद्दल काही नवे सिद्धान्त मांडले होते. आपले हे सिद्धान्त लेखरूपाने त्याने एका मासिकाला पाठविले होते. या लेखाने थोडासाच मोबदला पण बरीचशी कीर्ती चार्ल्सला मिळवून दिली. विद्युत् उपकरणांचे पेटंट घेणाऱ्या अमेरिकेतील एका कंपनीचे मालक आर्कमियर यांनी तर चार्ल्स रुडॉल्फ हे नाव चांगलेच लक्षात ठेवले. हा लेख आणि विजेविषयी नवे सिद्धान्त मांडणारा मुलगा अवघा सतरा वर्षांचा आहे याच्यावर मात्र त्यांचा विश्वास मुळीच बसला नसता.

❖

## □ ७. तू परत जा

अमेरिकेतील तपासणी कार्यालयाच्या कचेरीत चार्ल्स खिन्नपणे एकटाच उभा होता. अमेरिकेत आलेला हा नवा पाहुणा अमेरिकेत प्रवेश द्यायला लायक आहे की नाही हे आता ठरायचे होते. चार्ल्सच्या समोरच दोन तपासणी अधिकारी उभे होते. दोघांच्याही नजरेत नाराजी होती. समोरचे बेंगरूळ ध्यान अमेरिकेत कशासाठी आले आहे हेच त्यांना कळत नव्हते.

त्या तपासणी अधिकाऱ्यांच्या नजरेतील नाराजी चार्ल्सला स्पष्टपणे दिसत होतीच. ते संकट त्याला नवे नव्हते. त्याच्या छोट्याशा आयुष्यात त्याने वारंवार अनुभवलेली तीच एक गोष्ट होती. केवढ्या उमेदीने तो बोटीवर चढला होता. 'त्या अपेक्षा फोल ठरणार का ?' त्याचे मन त्याला विचारीत होते. तेवढ्यात त्याच्या कानावर शब्द आले.

"मित्रा, तू परत जाणाऱ्या बोटीनं परत फिरावंस हेच उत्तम. अमेरिकेला, आमच्या देशाला तुझा काही फायदा नाही. तू परत जा."

तपासणी अधिकाऱ्याने शेवटी आपला निर्णय चार्ल्सला कळविला.

"आपण हा निर्णय कसा घेतला हे कृपया मला कळेल का ?"

तपासणी अधिकारी आणि चार्ल्स यांच्या कानावर हे शब्द एकाच वेळी पडले. हा प्रश्न विचारणारा माणूस होता ऑस्कर. ऑस्कर तेवढ्यावरच थांबला नाही. तो म्हणाला, "मित्रांनो, या समोरच्या माणसाच्या रूपावर जाऊ नका. त्याची योग्यता त्याच्या रूपात नाही. तो



कोण आहे, किती मोठा आहे याचा पुरावा त्याच्या बॅगेत आहे.''

चार्ल्सचा लेख छापून आलेल्या मासिकाचा अंक तपासणी अधिकाऱ्यांच्या पुढे नाचवीत ऑस्कर पुढे म्हणाला, ''ज्याच्या लेखाची आणि लिखाणाची संपादकांनी इथं वारेमाप स्तुती केली आहे तो उद्याचा संशोधक तुमच्यासमोर उभा आहे. जगानं त्याची इतकी उपेक्षा केली आहे की, अधिक उपेक्षा सहन करण्याचं बळ माझ्या मित्राच्या इवल्याशा काळजात आता राहिलेलं नाही.''

ऑस्करच्या बोलण्याने ते तपासणी अधिकारी चमकलेच. ऑस्करच्या हातातील मासिक त्यांनी पाहिल्यासारखे केले. दोघांत काही हलकेसे संभाषण झाले.

त्यानंतर ते हसून चार्ल्सला म्हणाले, ''मित्रा ! अमेरिकेत तुझं स्वागत असो !''

चार्ल्सचा हात धरून ऑस्कर कचेरीतून बाहेर पडला.

''त्याच्या डोळ्यांतली चमक आणि निर्धार काही वेगळाच आहे,'' तपसणी अधिकाऱ्यांच्या तोंडचे शब्द ऐकून ऑस्कर मनातल्या मनात हसला.

घोडे जोडलेल्या एका गाडीतून ऑस्कर आणि चार्ल्स निघाले. गाडीत आणखी बरीच माणसे होती. ते पंधरावीस माणसांचे जड ओझे दोन घोडे कसेबसे ओढीत होते. गाडीवान चाबकाचे फटके घोड्यांच्या पाठीवर उडवीत होता. गाडीतील माणसे गप्पागोष्टींच्या नादात होती. घोड्यांचे दुःख त्यांच्यापैकी कोणालाच जाणवत नव्हते. पण त्या फटक्यांनी व्याकुळ झालेला चार्ल्स ऑस्करला म्हणाला, ''ऑस्कर, तुला कल्पना नाही. विजेचा शोध इतका क्रांतिकारक आहे की, तो या घोड्यांच्या या यातना वाचवील. विजेवर चालणाऱ्या गाड्या नजीकच्या काळात धावू लागतील.''

''धावतील, जरूर धावतील. कदाचित ह्या थोर शोधाचा जनक तूच असशील. होय ना ?'' ऑस्करने त्याला विचारले.

चार्ल्स काहीच बोलला नाही. तो मंदपणे हसला. अगदी मंदपणे. घोड्याच्या पाठीवर उडणारे फटके अजूनही त्याला अस्वस्थ करीत होते.

❖

## ☐ ८. तुझं वय तरी काय ?

सकाळी सकाळीच आपल्या कारखान्यात आर्कमिअर येऊन बसले होते. उंच्या-पुऱ्या व्यक्तिमत्त्वाचे, शुभ्र दाढी असलेले आर्कमिअर हे फेल्ट हॅट तयार करणाऱ्या कारखान्याचे मालक होते. विजेच्या नव्या शोधाविषयी त्यांना खूपच कुतूहल वाटत होते. आपल्या रिकामपणाच्या क्षणात विजेच्या यंत्राविषयी ते तऱ्हेतऱ्हेचे प्रयोग करीत. अलीकडेच वाचलेल्या चार्ल्स रुडॉल्फ यांच्या लेखामुळे तर विलक्षण प्रभावित झाले होते. त्यांच्या मनातील खळबळ, विचार आणि कल्पनाच त्या लेखातून प्रगट झाल्या होत्या. त्यांच्या मनातील काही अंधुक कल्पनांना तर ते त्या लेखाने उजाळा दिला होता. ''असा सहायक मला लाभला तर ?'' ते मनाशीच म्हणाले. मुद्दाम समोरच ठेवलेल्या मासिकातील चार्ल्स रुडॉल्फ या लेखकाचा लेख ते नव्या कुतूहलाने परत वाचू लागले.

''आपणाला भेटायला कोणी इंजिनिअर बाहेर आले आहेत,'' बाहेर बसलेला तरुण कारकून आत येऊन म्हणाला.

''कोण आहेत ते ?'' लेख वाचण्यात गर्क असलेल्या आर्कमिअरनी विचारले.

''कुणास ठाऊक !'' नापसंतीने मान उडवीतच त्या तरुण कारकुनाने उत्तर दिले.

''ठीक आहे. पाठव त्यांना आत,'' आर्कमिअर म्हणाले, ''या नव्या इंजिनिअरनी खरोखरच भंडावून सोडलंय. नाही नाही म्हणून तरी

किती वेळा सांगायचं ?'' आर्कमिअर स्वतःशीच पुटपुटले.

समोरून येणाऱ्या व्यक्तीकडे नंतर ते पाहातच राहिले. पाठीवर कुबड असलेला मोठ्या डोक्याचा चार्ल्स आत आला. हा माणूस इंजिनिअर असावा याचे आश्चर्य करीतच त्यांनी चार्ल्सच्या निश्चयी टपोऱ्या डोळ्यांकडे नजर वळविली. त्याच्या नजरेने ते दिपून गेले. त्याची नजर निरखीत ते चार्ल्सला म्हणाले, ''बसा.''

''मी चार्ल्स रुडॉल्फ आपल्या कारखान्यात नोकरी मिळेल का विचारायला आलोय्.'' चार्ल्स शांपणाने म्हणाला.

''चार्ल्स रुडॉल्फ? या लेखाचा लेखक तर नाहीस ?'' आर्कमिअर आश्चर्याने ओरडलेच.

''होय, माझाच आहे तो लेख,'' चार्ल्सने नम्रपणाने सांगितले.

''चार्ल्स ! चार्ल्स रुडॉल्फ ! मग तुमचं वय तरी काय ?'' आर्कमिअर स्वतःचीच खात्री करू लागले.

''मला नुकतीच सतरा वर्षे पूर्ण झाली. याच वर्षी मी डिप्लोमा मिळवला. विद्युत्‌शास्त्राविषयी खूप ओढ आहे मला ......''

''गृहस्था ! मग जनरल इलेक्ट्रिक कंपनीत जाण्याऐवजी इथं कसा आलास ! तू तरुण आहेस. तुझे डोळे तुझा धडपडा स्वभाव सांगतात. हा एकच लेख तुझ्या बुद्धिमत्तेची साक्ष पटवतो. तुझ्यासारख्या हुषार, धडपड्या माणसाचं तिथं स्वागत होईल. एडिसनसाहेबांना तुझ्यासारखी माणसं साहाय्यक लाभली तर जग इकडचं तिकडं करतील ते. वाटलं तर मी चिठी देतो त्यांना.''

''नको साहेब ! मी तिथूनच हा आत्ता येतोय्. त्यांना नवीन इंजिनिअरची गरज नाही. तिथल्या कारकुनानंच मला ही माहिती सांगून परतवून लावलं. एडिसनसाहेबांना भेटायची वेळच आली नाही.''

''चार्ल्स रुडॉल्फ! मग मी तुझं स्वागत करतो. माझा कारखाना फेल्ट हॅट्स तयार करण्याचा आहे. पण माझी खरी आवड

विद्युत्‌उपकरणांची आहे. माझी स्वतःची प्रयोगशाळा आहे. चल, तुला माझी प्रयोगशाळा दाखवतो. आजपासून त्या प्रयोगशाळेचा प्रमुख म्हणून तू काम कर. नोकर म्हणून नाही, तर मालक म्हणून तू ती प्रयोगशाळा सांभाळ. मला खात्री आहे, तू या क्षेत्रात चमकशीलच. चल, आत्ताच आपण प्रयोगशाळेत जाऊ या.''

आर्कमिअरबरोबर त्यांच्या प्रयोगशाळेत जात असताना आपण एका नव्याच विश्वात प्रवेश करीत आहोत असा भास चार्ल्सला झाला.

❖

# □ ९. नवे मित्र, नवा शोध

चार्ल्सने देश बदलला तसे आपले नावही बदलले. अमेरिकेत तो स्टाईन्मेट्झ या नावाने आता वावरू लागला. चार्ल्स त्यानंतर कामावर जणू तुटून पडला. आपल्यासारख्या उपेक्षित माणसाला अशी सुसज्ज प्रयोगशाळा लाभेल, आपल्यावर पित्यासमान प्रेमवर्षाव करणारा आर्कमिअरसारखा मालक लाभेल, अशी कल्पना चार्ल्सने स्वप्नातही केली नव्हती.

चार्ल्सने विजेवरचे संशोधन सुरू झाले. वेड्यासारखा चार्ल्स आपल्या आवडत्या विषयावर काम करू लागला. 'वडिलांची प्रेरणा लाभली नसती तर कदाचित त्यांच्यासारखा रेल्वेतच मी कामगार वा कारकून म्हणून राहिलो असतो.' त्याच्या मनात हा विचार अनेकदा यायचा. जगाने केलेल्या अपमानाने, उपेक्षेने विद्ध न होता, त्याने तो अपमान आपल्या अभ्यासात बुडवून टाकला होता. आपले वडील आणि ऑस्कर यांनी केलेले प्रेम आठवून तो गहिवरून जायचा. कारखान्यातील लोक घरी निघून गेले तरी चार्ल्स प्रयोगशाळेत एकटाच आपल्या कामात गढून गेलेला असायचा. दिवसाचे बारा बारा तास तो अव्याहत काम करायचा. विद्युत्शास्त्रातील नवीन नवीन कल्पना त्याच्यासमोर प्रगट व्हायच्या.

एक दिवस, माणसांचे अवजड ओझे घोड्यांना वाहावे लागणार नाही, वीजच ते काम करील, हे आपल्या मित्रापाशी - ऑस्करपाशी -

वर्तविलेले भविष्य आपल्यासमोर मूर्त स्वरूपात दिवसेंदिवस प्रगट होत आहे असे त्याला वाटायचे आणि तो त्या आनंदाने वेडावून जायचा.

आपला हा आनंद कोणाला तरी सांगितला पाहिजे असे त्याला वाटे. त्याचा मित्र ऑस्कर जर्मनीला परत गेला होता. घरी येताच त्याला एकदम रिकामपण जाणवे. आपल्या ह्या रिकाम्या वेळाचे काय करायचे त्याला कळत नसे.

पण चार्ल्सला कठीण वाटणारा हा प्रश्न एका छोट्या प्राण्याने सोडविला. हा प्राणी एकदा आगंतुकपणे चार्ल्सच्या खोलीत आला. हा प्राणी म्हणजे एक मांजराचे पिलू होते. त्या मांजराच्या पिलाला पाहिल्याबरोबर चार्ल्सचे प्राणिप्रेम परत उफाळून आले. त्याच्या हृदयाच्या कोपऱ्याशी कुठे तरी ती प्रेमभावना घर करून होती. आता सुस्थिती प्राप्त झाल्यावर चार्ल्सला वाटले की, यांचीच - या प्राण्यांचीच - संगत आपल्याला खरा आनंद देऊ शकेल.

आणि मग चार्ल्सची प्राणिशाळा सुरू झाली. पहिला प्रवेश मांजराने घेतला. त्यानंतर दोन-तीन दिवसांनीच घडलेली गोष्ट. आपल्या नव्या खरेदी केलेल्या दुचाकीवर बसून चार्ल्स कारखान्यात येत होता. कारखाना ते त्याचे निवासस्थान, हे सुमारे सहा मैलांचे अंतर होते. वाटेत विस्तीर्ण अरण्य लागायचे. चार्ल्स कारखान्यात येत असताना रस्त्याच्या कडेला त्याला विचित्र चीत्कार ऐकू आला. त्याने सायकल कडेला वळवली. समोरचे दृश्य पाहून त्याचे अंतःकरण कळवळले. एक माकडीण मरून पडली होती. त्या मरून पडलेल्या माकडिणीला तिचे लहान पिलू लुचत होते.

चार्ल्सला ते दृश्य पाहून स्वस्थ राहावेना. तो रस्त्याच्या कडेला खाली उतरला. त्याला पाहून ते माकडाचे पिल्लू घाबरले नाही की पळून गेले नाही. त्याच्याकडे तसेच टकटक पाहात राहिले. चार्ल्सने त्याला उचलले आणि छातीशी धरले. त्याला ते एकदम बिलगले. त्या पिलाने आपल्यावर टाकलेला विश्वास पाहून चार्ल्सला धन्य वाटले. त्याने

सायकल वळवून घेतली आणि तो घरी निघाला. त्या पिलाला तो घरी घेऊन आला. त्याला त्याने दूध घातले, ते पिल्लू टकाटका त्याच्याकडे पाहात राहिले. खोली बंद करून तो कारखान्यात गेला. त्या दिवशी संध्याकाळी तो घरी आला तेव्हा पायात घोटाळणाऱ्या मांजराच्या पिलाने आणि त्याला पाहून उड्या मारीत चीत्कारणाऱ्या माकडाच्या पिलाने त्याचा सारा थकवा दूर केला.

चार दिवसांनंतर एकदा त्या माकडाच्या पिलाला सायकलवर बसवून चार्ल्स कारखान्यात गेला. कारखान्याच्या बाहेरच्या एका झाडावर चार्ल्सने त्याला चढविले. संध्याकाळी चार्ल्स कारखान्यातून बाहेर येईपर्यंत ते पिल्लू त्या झाडावरच होते. चार्ल्स कारखान्यातून बाहेर यायची वाट पाहात ते बसले होते. चार्ल्स बाहेर पडून त्याच्या सायकलीजवळ आला. त्या पिल्लाने धप्पदिशी त्याच्या पाठीवर उडी घेतली. त्यानंतर हा दररोजचा क्रम झाला. सकाळ-संध्याकाळ पिलाला सायकलवर बसवून कारखान्यात येणाऱ्या चार्ल्सकडे पाहून कारखान्यातील सारेजण हसायचे.

चार्ल्सचे संशोधन चालूच होते. विजेवरचे त्याचे प्रयोग आकार घेत होते. आर्कमिअर त्यासाठी हवी ती वस्तू विकत घेत होते. सतत आठ आठ तास चार्ल्स त्या संशोधनासाठी वेडा होऊन काम करीत होता आणि एक दिवस चार्ल्स सरळ आर्कमिअरच्या कार्यालयात येऊन म्हणाला, ''विजेच्या साह्यानं गाडी चालवण्यासंबंधीच्या संशोधनाचं प्रात्यक्षिक पाहायची वेळ आली आहे. तुम्ही तयारीला लागा.''

आर्कमिअर खुषीत उठले. ते एका उडीतच चार्ल्सजवळ आले. त्यांनी चार्ल्सला मिठीच मारली. म्हणाले, ''मित्रा, तू काय सांगतोस ? विजेच्या साह्यानं गाडी चालवायची म्हणतोस ? छे ! अगदी हलकल्लोळ माजेल बघ ! ठीक. मी लागतोच तर कामाला.''

सारा कारखाना त्यांनी आरडूनओरडून जागा केला. चार्ल्सने केलेल्या संशोधनाची माहिती त्यांनी कामगारांना सांगितली. पण

कोणाचाच त्यावर विश्वास बसेना. हा समोरचा बावळट दिसणारा कुबडा असे काही जगावेगळे घडवील याच्यावर कोणी विश्वास ठेवायलाच तयार होईना.

पण त्यानंतर बरोबर एक महिन्याने तो सोनेरी दिवस उजाडला. तो दिवस रविवारचा होता. त्या दिवशी आर्कमिअर, त्यांच्या कारखान्यातील शेकडो कामगार, वर्तमानपत्रांचे बातमीदार आणि हजारो प्रेक्षक ब्रुकलीनच्या मैदानावर जमले होते. लोक अजूनही साशंक होते. 'बिनघोड्याची गाडी कशी धावू शकेल ?' ते एकमेकांना प्रश्न विचारीत होते.

इतक्यात कोणीतरी म्हणाले, ''त्याच्यासाठी त्या कुबड्या इंजिनिअरनं काही तरी शक्ती निर्माण केली आहे. त्या शक्तीच्या जोरावर ती गाडी धावणार आहे.''

''पण ती शक्ती त्यानं ठेवलीय कुठं ?'' दुसऱ्या एकाने विचारले.

''मी सांगतो, त्याच्या पाठीवरच्या त्या मोठ्या कुबडात ?'' कोणीतरी कुत्सितपणे परस्पर उत्तर दिले.

आर्कमिअर चार्ल्सने कारखान्यात तयार केलेले विद्युत्यंत्र घेऊन आले. घोडे असलेल्या गाडीचे घोडे वेगळे करून त्यांनी ते यंत्र त्या गाडीला जोडून घेतले. विजेचा प्रवाह योग्य रीतीने सुरू होतो की नाही याची तपासणी झाली आणि मग चार्ल्स, आर्कमिअर व त्यांचे दोन सहकारी गाडीत बसले. सारे लोक आ वासून काय घडते आहे याची वाट पाहू लागले.

चार्ल्सने यंत्र सुरू केले. गाडीला छोटा हिसका बसला आणि बिनघोड्याची विजेची पहिली गाडी रस्त्यावरून धावू लागली. ताशी वीस मैल वेगाने तिने दौड सुरू केली.

रस्त्याच्या बाजूला उभ्या राहिलेल्या हजारो प्रेक्षकांनी एकदम जयघोष केला - ''नव्या युगाचा विजय असो ! चार्ल्स रुडॉल्फचा विजय असो !''



गाडी धावत होती. विजेची पहिली गाडी धावत होती. आर्कमिअर चार्ल्सच्या खांद्यावर हात ठेवून उभे होते. त्यांच्या डोळ्यात आनंदाश्रू होते. त्या अश्रूंच्या पडद्याआड उद्या अमेरिकेत धावणाऱ्या विजेच्या गाड्या त्यांना दिसत होत्या. शेकडो–हजारोंच्या संख्येने ह्या गाड्या धावत आहेत असे भविष्य त्यांना त्या क्षणी जाणवले.

अवघ्या सव्वीस वर्षांच्या चार्ल्सने खरोखर अमेरिकेत नवे युग निर्माण केले होते.

❖

# ☐ १०. तीन घरकुले

त्यानंतर चारच दिवसांनी थॉमस आल्वा एडिसनच्या जनरल इलेक्ट्रिक कंपनीचा प्रतिनिधी आर्कमिअरच्या कंपनीत आला. त्या श्रेष्ठ कंपनीचा माणूस आपण होऊन कारखान्यात आल्याचे पाहून आर्कमिअरना आश्चर्य आणि आनंद वाटला. जनरल इलेक्ट्रिक कंपनी म्हणजे विजेच्या जगातील आश्चर्य होते. विजेसंबंधीचे प्रत्येक उपकरण हे या कंपनीचेच असणार हा जणू नियमच झाला होता.

तो प्रतिनिधी आर्कमिअरना म्हणाला, ''तुमच्याकडील तरुण इंजिनिअरसाठी मोठ्या पगाराची नोकरी घेऊन आलोय् मी.''

''खरोखर तुमच्या कंपनीत काम करावं असाच थोर माणूस आहे तो. माझी काहीच हरकत नाही त्याला. तो त्याच्याच खुषीचा प्रश्न आहे,'' आर्कमिअर उदारपणे म्हणाले.

''पण तो तरुण ही कंपनी सोडायला मुळीच तयार नाही. दोन दिवस मी त्याच्यामागं लागलोय. शेवटी आज एक नवीच योजना घेऊन मी आलोय्.'' तो प्रतिनिधी म्हणाला.

''बोला !'' असे म्हणून आर्कमिअर तो काय सांगतो आहे हे मोठ्या आतुरतेने ऐकायला तयार झाले.

''जनरल इलेक्ट्रिक कंपनीनं तुमची ही कंपनीच विकत घ्यायचं ठरविलंय्. तुम्ही म्हणाल ती किंमत. तुमचा शब्द हा अखेरचा शब्द असेल.''

''केवळ चार्ल्स स्टाईनमेट्झला-रुडॉल्फला तुमच्या नोकरीत आणण्यासाठी माझा सर्व कारखाना विकत घेणार ?'' आर्कमिअरनी आश्चर्याने विचारले.

''तेवढंच नाही. आणखीही एखादी अट घालायची असेल तर घाला. या गुणी इंजिनिअरसाठी जनरल इलेक्ट्रिक कंपनी म्हणाल ते करायला तयार आहे,'' त्या प्रतिनिधीने ठामपणे सांगितले.

चार्ल्सचा - एका कुबड्या तरूणाचा - हा केवढा विजय होता ! जनरल इलेक्ट्रिक कंपनीने चार्ल्सला आपल्या नोकरीत आणण्यासाठी काहीही करायची तयारी दाखविली होती. आर्कमिअरनी मोठ्या प्रयासाने या साऱ्याला संमती दिली आणि मोठ्या प्रयासानेच या गोष्टीला चार्ल्सचीही संमती मिळविली. आपल्या हितकर्त्यांच्या - आर्कमिअरच्या भल्यासाठी चार्ल्स या व्यवहाराला तयार झाला.

भला लठ्ठ पगार, हव्या त्या सोयीसवलती मिळूनही चार्ल्सने आपला गबाळा पोषाख कधीही टाकला नाही. ज्या दिवशी त्याने पदवी-परीक्षेचा सूट बासनात गुंडाळून ठेवला त्याच दिवशी त्याने पोषखीपणाचा त्याग केला. पोषाखीपणाविषयी तिरस्काराशिवाय त्याच्या मनात काहीच भावना उरली नाही. माणसाच्या मनाच्या मोठेपणाचा भुकेला असलेल्या चार्ल्सने या पोषाखी जगाविषयी आकस मात्र धरला नाही. तो त्याचा स्वभावच नव्हता. जन्मभर उपेक्षा सहन करूनही त्याच्या मनातील अनुकंपेचा झरा त्याने कधीही आटू दिला नाही.

गेल्या सहा वर्षांत त्याच्या प्राणिशाळेत केवढी वाढ त्याने केली होती. त्याच्या कुबडाला, त्याच्या बेंगरूळपणाला, त्याच्या कुरूपपणाला न घाबरता, त्याचा तिरस्कार न करता त्याच्याजवळ आपुलकीने येणारी तीच मंडळी होती. त्याच्या खोलीत दाटीवाटीने सुमारे पंधरा प्राणी राहात होते, तर खोलीबाहेरच्या झाडाझुडपांवरही ही प्राणी मंडळी विसावली होती. कावळ्यासारखे प्राणीही त्यात होते. दुरून येणारी चार्ल्सची

सायकल दिसली की, झाडावरून उतरून सायकलच्या दांडीवर, चार्ल्सच्या खांद्यावर मिळेल तिथे ही मंडळी बसत आणि आनंदाने चिवचिवाट, कलकलाट करीत.

चार्ल्सला, या त्याच्या मित्रांमुळे तो राहात होता ती जागा अपुरी आणि अडचणीची वाटू लागली. त्याने स्वतःचे नवे घर बांधण्यासाठी एक जागा निवडली. एक दिवस चार्ल्सने आर्कमिअरना नेऊन त्यांना ती जागा दाखविली. त्यासाठी चार्ल्सने शहराबाहेर मैलोगणती जागा विकत घेतली होती. चार्ल्सने दाखविलेली जागा पाहून आर्कमिअर अगदी बुचकळ्यात पडले. चार्ल्सचे पोषाखाविषयीचे मत त्यांना माहीत होते. पण चार्ल्स खरोखर सौंदर्याचा तिरस्कार करणारा माणूस असला पाहिजे असेही त्यांना त्या क्षणी वाटून गेले.

इतकी गचाळ आणि घाणेरडी जागा आतापर्यंत आर्कमिअरनी पाहिली नव्हती. दगडधोंड्यांनी वेढलेला एक साधासा माळ असता तरी आर्कमिअरनी तो पसंत केला असता. पण जागजागी साचलेल्या पाण्याच्या डबक्यांनी चार्ल्सने निवडलेल्या जागेवर इतकी दुर्गंधी येत होती की, आर्कमिअरना तिथे अधिक वेळ थांबवेना. अंतराअंतरावर असलेल्या त्या डबक्यात कोणते प्राणी वळवळत होते हेही सांगता आले नसते. चार्ल्सने ती जागा का पसंत केली हे त्यांना कळेना. पावसाळ्यात तर तिथले खाचखळगे पाण्याने भरून वाहात असले पाहिजेत, हे उघड होते. घर बांधता येईल अशी स्वच्छ, सपाट जागा त्या चौरस मैलात त्यांना कोठेही दिसली नाही. त्यासाठी पाठीमागचे जंगल तोडून तिथे वसाहत करावी लागली असती.

पण चार्ल्सला त्यांनी विरोध केला नाही. चार्ल्सच्या टपोऱ्या निग्रही डोळ्यांआड काही तरी स्वप्न तरळत असले पाहिजे हे त्यांनी तत्क्षणी ओळखले.

त्यानंतर तीनच महिन्यांत त्या उकिरड्यावर चार्ल्सने एक नयनमनोहर सृष्टी निर्माण केली. सगळे खाचखळगे त्याने एका रेषेत

कल्पून त्या खाचखळग्यांची त्याने खणून भली मोठी दोन मैल लांबीची नदी केली. त्या तयार नदीवर त्याने एक सुंदर पूल बांधला. पलीकडच्या तिन्ही डबक्यांतील घाण पाणी उपसून ती डबकी वर्तुळाकार करविली. त्या डबक्यांना आता सुंदर तळ्यांचे रूप आले. त्यानंतर त्याने वरच्या अंगाला तीन घरकुले उभारली. मधले घरकुल स्वतःसाठी. त्याच्या पलीकडील डाव्या अंगाचे घरकुल प्राणिमित्रांसाठी आणि उजव्या अंगाचे घरकुल चार्ल्सच्या मित्रमंडळींसाठी. हे सारे चालू असतानाच त्याने मागची जागा कोठे हिरवळीने तर कोठे छोट्या झाडाझुडपांच्या लागवडीने भरून टाकली. पहिला पाऊस पडला. त्यानंतर भरभरून पाऊस आला. चार्ल्सने तयार केलेली कृत्रिम नदी पाण्याने तुडुंब भरली. पुढे असलेल्या बांधामुळे तिचे पाणी आयतेच अडून राहिले. चार्ल्सने त्या बांधावर पाणी सोडायच्या झडपा ठेवल्या. मग त्या नदीत चार्ल्सने मोठे मोठे मासे सोडले.

कोरड्या केलेल्या डबक्यात - छे तळ्यात ते पावसाचे नवे स्वच्छ पाणी आले आणि एक दिवस ती तळी कलकलाट करणाऱ्या बदकांनी भरून गेली. पावसाच्या मध्यालाच आपल्या सर्व प्राण्यांना घेऊन चार्ल्सने या नव्या वास्तूत गृहप्रवेश केला.

त्याच्या या गृहप्रवेशानंतर चार्ल्सला भेटायला आलेले आर्कमिअर ती नवी सृष्टी पाहून चकित झाले, स्तिमित झाले. छोटी नदी ओलांडून जात असतानाच ते पुलावर थांबले. तिथे थांबून त्यांनी सभोवतालचे दृश्य पोटभर पाहून घेतले. मागच्या हिरव्या रानाच्या पार्श्वभूमीवर ती तीन सुंदर घरकुले किती मोहक वाटत होती ! कितीही पाहिले तरी आर्कमिअरच्या डोळ्यांची तृप्ती कशी ती होत नव्हती. ते पुलावर उभे असतानाच दूर वळण घेऊन झाडीत लपलेल्या छोट्या नदीतून एक होडी पुलाच्या बाजूला आली. चार्ल्सच ती होडी वल्हवीत होता. त्या होडीत त्याच्या नेहमीच्या आकडेमोडीच्या वह्या होत्या, पुस्तके होती. आर्कमिअरना पाहून तो आनंदला. पायऱ्या चढून तो वर पुलावर आला.

आर्कमिअरचे अंतःकरण अगदी हळुवार झाले होते. ''तुझ्यासारखा मुलगा मला लाभला असता तर मी स्वतःला धन्य समजलो असतो !'' आर्कमिअर त्याला जवळ घेत म्हणाले.

''मी तुमचा मुलगाच आहे,'' चार्ल्स म्हणाला.

''किती सुंदर घरकुलं उभारलीस तू ! नुसती घरकुलं नाहीत ही. मला तर प्रत्यक्ष नंदनवनात आल्यासारखं वाटतंय्.''

''अगदी अशीच तीन घरकुलं मी माझ्या लहानपणी उभारली होती.'' चार्ल्स सांगू लागला, ''घरासमोर अशी छोटी नदी मी बनविली होती. अगदी तेच, त्या वेळचं चित्र माझ्या डोळ्यासमोर होतं. माझी ती घरकुलं अपघातानं जळली. मी लावलेल्या मेणबत्त्यांमुळे ती दुर्घटना घडून आली. आज ही घरं मात्र सुरक्षित झाली आहेत. एडिसनसाहेबांच्या विजेच्या दिव्यामुळं हा चमत्कार घडला. तेव्हा मला किती वाईट वाटलं होतं. माझ्या त्या घराबरोबर माझी मांजरीची पिलंही त्या वेळी त्या आगीच्या धगीनं होरपळून मेली होती.''

''कशाला त्या दुःखद आठवणी काढतोस, चार्ल्स ?'' आर्कमिअर त्याला थांबवीत म्हणाले, ''ते दुःख, ती संकटं यांच्यापासून आता तू खूप दूर आला आहेस.''

''खरंच, ती संकटं म्हणजे आता स्वप्नासारखी वाटतात,'' चार्ल्स असे बोलून गेला खरा, पण वर गडगडणारे आकाश हसत होते - कुत्सितपणे, विकट हास्य !

❖

# ११. अखेरचा अपघात

त्या दिवशी सारे वातावरण कुंद होते. सकाळपासून भुरभूर पाऊस पडत होता.

चार्ल्स आज घरातच बसून होता. सकाळपासून नेहमीच्या आकडेमोडीत तो रंगून, गुंगून गेला होता. मध्ये एकदा उठून कलकलाट करणाऱ्या बदकांना त्याने प्राणिघरात कोंडले होते. तो प्राणिघरात गेला तेव्हा आवाज करून माकडाच्या पिलाने पिंट्याने त्याला जवळ बोलाविले. चार्ल्स जवळ गेला तेव्हा पिंजऱ्यातून त्याने चार्ल्सची दाढी ओढली. चार्ल्सला काय वाटले कोणास ठाऊक ! त्याने दार उघडून त्याला बाहेर काढले. त्याच्या खांद्यावर बसून पिंट्या घरात आला तेव्हा मात्र घरातील कुत्र्याने आणि मांजराने त्याबद्दल आपली नापसंती दाखवायला कमी केले नाही.

त्यानंतर थोडेसे खाऊन चार्ल्स परत आकडेमोडीत गढून गेला. बाहेर पाऊस कोसळू लागला. त्याच्या समोर बसलेला पिंट्या तोंडातून विलक्षण आवाज काढू लागला. मध्येच उडी मारून तो बाहेर गेला. थोडा वेळ तो बाहेरच होता. चार्ल्सची आकडेमोड ऐन भरात आली होती. संध्याकाळी आर्कमिअर गाडी घेऊन येणार होते. त्यांना काहीतरी नवी माहिती चार्ल्स देणार होता. त्याने मांडलेले कोडे उलगडत होते, सुटत होते. आता अगदी थोडेसेच काम शिल्लक होते.

तेवढ्यात पिंट्या वाऱ्यासारखा आत घुसला, टेबलावर उडी मारून

चीत्कारत त्याने चार्ल्सला ओरबाडल्यासारखे केले. पण चार्ल्सचे त्याच्याकडे लक्ष नव्हते. पिंट्याने त्याला परत ओरबाडले. चीत्कारत त्याने चार्ल्सच्या वहीवर झडप घातली आणि चीत्कारतच ती वही उचलून तो बाहेर पळाला. सुसाट पळाला. चार्ल्स चमकला. पेन्सिल टाकून तो एकदम उभा राहिला. पळत जाणाऱ्या पिंट्यामागे धावत सुटला. पिंट्याने एकदाच मागे वळून चार्ल्स मागे येतोय की नाही हे पाहिले. मग परत तसाच चीत्कारत तो पुलाच्या दिशेने धावला. चार्ल्स देखील तसाच धावत त्याच्या मागे पळाला. त्या दोघांनी पूल ओलांडला न ओलांडला तोच मागे कडाड्....कडाड्.... चा प्रचंड भीषण आवाज आला. चार्ल्स मागे वळून पाहतो तोच आकाशातून खाली वेगाने येऊन त्याच्या घरकुलावर कोसळलेली एक वेडीवाकडी प्रकाशरेखा त्याला दिसली. त्याच्यानंतर घरकूल कोसळल्याचा प्रचंड आवाज, पलीकडच्या प्राणिघरातून क्षणभरच वातावरणात उमटलेले आर्त चीत्कार त्याच्या कानांनी ऐकले. जे भीषण भयंकर घडले ते काय आहे हे चार्ल्सला कळून



चुकले. आपल्या मानवी हातांनी विजेला बंदिस्त करणाऱ्या त्या कुबड्याचे सारे विश्व आकाशातील त्या तेजोरेखेने उद्ध्वस्त केले होते. निसर्गाने केलेला तो भीषण संहार चार्ल्सने आपल्या डोळ्यांनी पाहिला होता. त्याच्या पायाशी थरकापत, चीत्कारत पिंट्या बसला होता. त्याला कुरवाळण्याचे भान देखील चार्ल्सला राहिले नाही. कठड्याला धरून राहिलेले त्याचे हात विलक्षण थरथरत होते, कंप पावत होते.

मागून आलेल्या अर्कमिअरनी त्याला हाताला धरून गाडीत कधी बसविले हे त्याला कळले देखील नाही.

दुसऱ्या दिवशी सकाळी आर्कमिअरबरोबर चार्ल्स परत आपल्या निवासस्थानात आला. आर्कमिअरनी अगोदरच माणसे पाठवून प्राण्यांचे घरकूल स्वच्छ केले होते. आपल्या प्राणिमित्रांची दैना चार्ल्सला पाहावली नसती. चार्ल्सचा कुत्रा आणि मांजरही मरून पडली होती. आर्कमिअरच्या माणसांनी त्या साऱ्यांची प्रेते तिथून हलविली होती.

सकाळी आर्कमिअरबरोबर तो घरात आला. तो बसलेल्या मेजासमोरच्या आरशाचा फुटून चक्काचूर झाला होता. त्या आरशाचे शेकडो तुकडे खाली जमिनीवर पडले होते. चार्ल्सची बसायची खुर्ची जळून गेली होती. मागची भिंत कोलमडून पडली होती. पिंट्याने आपल्याला केवढ्या संकटातून वाचविले हे पाहून चार्ल्सचे डोळे कृतज्ञतेने भरून आले.

मागून आलेल्या आर्कमिअरनी खोली साफ करायला आपल्या एका कामगाराला बोलाविले. तो कामगार ते काचेचे तुकडे गोळा करायला वाकला, तेवढ्यात एकदम घाईने चार्ल्स त्याला म्हणाला, ''थांब, ते काचेचे तुकडे उचलू नकोस. झाला हा अपघात आता अखेरचा ठरला पाहिजे.'' चार्ल्सच्या बोलण्याचे आर्कमिअरना आश्चर्य वाटले. ते चार्ल्सकडे पाहातच राहिले. चार्ल्स त्यांची प्रश्नांकित मुद्रा पाहून म्हणाला, ''कदाचित हे तुकडेच मला आकाशातील विजेचा धरतीवर कोसळण्याचा मार्ग काय आहे, कसा आहे हे सांगतील.''

“पण हे शेकडो, हजारो तुकडे .... कसे ठेवायचे .... ?” आर्कमिअरचे आश्चर्य संपत नव्हते.

“हे काचेचे तुकडे मला लाखमोलाच्या रत्नाहून अधिक किंमतीचे वाटतात. यातला प्रत्येक तुकडा मी गोळा करणार,” चार्ल्स म्हणाला. त्याचे डोळे वेगळ्याच निश्चयाने चमकत होते.

चार्ल्स खाली वाकून ते तुकडे गोळा करू लागला. आर्कमिअरही त्याला तुकडे गोळा करण्यात मदत करू लागले. प्रत्येक तुकडा वेचून चार्ल्सने तो पेटीत नीट रचून ठेवला. चार्ल्सला लाख मोलाची वाटणारी ती पेटी आर्कमिअरनी प्रयोगशाळेत पोचविली.

- आणि त्यानंतर चार्ल्स परत वेड्यासारखा कामाला लागला. त्याचे घरकूल, त्याचे प्राणिमित्र यांचा बळी घेणाऱ्या विजेचा मार्ग, आणि शक्ती याचा तो मागोवा घेऊ लागला. आरशाचे ते हजारो तुकडे त्याने मोठ्या मेहनतीने, कष्टाने जुळविले. त्या तुकड्यांतून तो विजेचा मार्ग शोधू लागला. त्याच्या आधाराने गणित मांडू लागला. ते चुकताच भूकतहान विसरून परत परत ते समीकरण मांडू लागला.

❖



# □ १२. वीज मुठीत आली

चार महिन्यांचा काळ लोटला. एका भव्य सभागृहात चार्ल्सच्या निमंत्रणावरून बडे बडे उद्योगपती, संशोधक, वार्ताहर, प्राध्यापक जमले होते. चार्ल्सने मांडलेले एक भलेमोठे नमुन्याचे खेडे त्यांच्यासमोर दिसत होते. मागची निळीकाळी टेकडी, उंचावर दिसणारे चर्च, त्यानंतर खाली दिसणारी घरांची रांग. खरोखर नयनमनोहर दृश्य चार्ल्सने त्यांच्यासमोर मांडले होते.

तेवढ्यात पलीकडचे दार उघडून चार्ल्स तिथे आला. आलेल्या लोकांचे स्वागत करून तो म्हणाला, ''विजेच्या एका नव्या युगात आपण वावरत आहोत. विजेला बंदी करून आपण तिला घरच्या कोनाड्यात आणून ठेवली आहे. पण आकाशातील वीज मात्र अजून मुक्त आहे. ती मोकाट सुटली तर आपण महाप्रयासानं उभारलेल्या सृष्टीचं ती मातेरं करते. तिला कशी आवरावी, तिच्या मोकाट स्वभावाला कसा बंध घालावा हीच आपली नवी समस्या आहे.''

थोडा वेळ थाबून तो पुढे सांगू लागला, ''माझ्या अल्प प्रयत्नांनी मी एक मार्ग शोधला आहे. तुमच्यासमोर हे एक सुंदर खेडं आहे. खेड्यातील फक्त एकाच इमारतीवर आकाशातील वीज जमिनीत नेऊन टाकणारा विद्युत्वाहक बसविला आहे. फक्त एकाच इमारतीवर मी हा माझा प्रयोग केला आहे. माझा नवा प्रयत्न याच शोधाचा आहे.''

नंतर तो आपल्या प्रयोगाच्या मेजपाशी जाऊन उभा राहिला. मग

म्हणाला, ''आता आकाशातील विजेचा कल्लोळ मी तुम्हाला दाखविणार आहे. तिची भयानकता तुम्ही जाणता. या विजेचा मार्ग नागमोडी असतो. हा असा....'' असे म्हणत चार्ल्सने जवळच्या यंत्राचे बटण दाबले. एक लहानशी प्रकाशरेखा अवतरली आणि त्या खेड्याच्या रस्त्याला समांतर टाकलेली तार तिने जाळून टाकली.

''विजेच्या प्रवाह अधिक जोरदार असेल तर तो एखाद्या प्रचंड वृक्षाचाही बळी घेईल .... हा असा ....'' असे म्हणत चार्ल्सने यंत्राचे दुसरे बटण दाबले. थोड्याच वेळात पहिल्यापेक्षा जोरदार प्रकाशरेखा नागमोडी मार्गाने अवतरली आणि तिने कोपऱ्यातले एक झाड पूर्ण जाळून टाकले.

''आकाशातील विजेची शक्ती याहूनही तीव्रतर असते, भयानक असते.'' चार्ल्स पुन्हा बोलू लागला, ''ती काहीही जाळू शकते, भेदू शकते. तिला कशी आवरावी, कशी रोखावी ही समस्या आहे. तुमच्या समोर असलेलं असं एखादं सुंदर खेडंही ही शक्ती उद्‌ध्वस्त करू शकेल. आता पाहा, तिकडं लक्ष द्या....'' चार्ल्सने असे म्हणत त्या यंत्राचे तिसरे बटण दाबले.

क्षणभरातच प्रचंड आवाज झाला. हजारो लोक असलेले ते सभागृह कोसळत आहे, असेच सर्वांना वाटले. किंकाळ्या, आरोळ्या नकळत सर्वांच्याच तोंडून बाहेर पडल्या. केवढी तरी नागमोडी तळपती रेषा त्या खेड्यावर कोसळताना सगळ्यांनी डोळ्यांनी पाहिली. दुसऱ्याच क्षणी समोर उसळलेला आगडोंब त्यानंतर केवढातरी तयार झालेला धुराचा पडदा त्यांनी बघितला.

समोरचा धूर विरत नाहीसा झाला. मागे गेलेले लोळ पुढे आले. समोरचे खेडे पूर्ण उद्‌ध्वस्त झाले होते, प्रत्येक घराचा त्या आगलोटाने बळी घेतला होता. चर्चही कोलमडले होते. स्तिमित, प्रभावित प्रेक्षकांच्या कानावर तेवढ्यातच परत चार्ल्सचा आवाज आला.

''आताचा प्रयोग म्हणजे आकाशातील मोकाट वीजरेखेचा मार्ग

मानवानं ओळखल्याचा पुरावा आहे. तिचा मार्ग, तिची शक्ती या साऱ्याचाच मागोवा या प्रयोगानं घेतला गेला. तिचं सारं विश्व जाळण्याचं नष्ट करण्याचं सामर्थ्य आपण पाहिलं, पण तिची विध्वंसक शक्ती पोहोचत नाही किंवा पोहोचली तरी संहार करू शकत नाही अशी एक मात्र जागा आहे. या खेड्याच्या कक्षेतून वेगळं असलेलं हे एकुलतं एक घर त्या आगलाटातून वाचलं आहे. त्या मोकाट विजेच्या अंगात ते घर जाळण्याचं, नष्ट करण्याचं सामर्थ्य नाही. ते सामर्थ्य आपलं आहे. आम्हा माणसांचं आहे. आजचा प्रयोग हा विजेच्या विनाशक शक्तीपासून आपलं संरक्षण कसं करायचं याचंच शिक्षण आपल्याला देईल. विजेने आपल्या आसुरी शक्तीनं आजवर अनेक अपघात घडविले. पण यापुढे असे अपघात ती घडवू शकणार नाही.'' चार्ल्स भाषण संपवून आत आला.

बाहेर आश्चर्याने थक्क झालेले लोक मोठमोठ्याने बोलत होते. चार्ल्सचं भाषण संपलं. तो दारातून आत वळणार एवढ्यात अनेक लोक त्याच्याशी हस्तांदोलन करण्यासाठी पुढे धावले. कॅमेरे क्लिकक्लिकले. चार्ल्सच्या नावाच्या जयघोषाने ते सभागृह परत दणदणू लागले. माणसामागे माणसे त्याच्यासमोर येत होती, बोलत होती, हसत होती.

त्या साऱ्या गर्दीतही चार्ल्सचे मन मात्र एकाकी, एकटे होते. त्याच्यावर स्तुतिसुमने उधळली जात होती. त्याच्या प्रशंसेचे पोवाडे गाइले जात होते. आज विजेचा लोळ त्याने मुठीत पकडला होता, पण त्यापूर्वी चार्ल्सवर प्रेम करणाऱ्या मित्रांचा तिने बळी घेतला होता. साऱ्या प्रेमहीन जगात अपेक्षेवाचून प्रेम करणारी तीच तेवढी मंडळी होती. चार्ल्सला वाटले, धावत जाऊन त्या प्राणिसृष्टीत रमावे, पण त्याला प्रेम देणारे ते जीव आता कुठे होते ?

चार्ल्सला त्या क्षणी तरी विलक्षण एकटे वाटू लागले. त्याच्या डोळ्यात कधी नव्हते असे अश्रू जमू लागले. त्या गर्दीत हे अश्रू पुसून टाकणारे, आपल्या पाठीवरून हात फिरवणारे कोणीच नाही हे तो



जाणत होता. अशा वेळी त्याला आठवण झाली ती वडिलांची. धावत जाऊन, त्यांच्या कुशीत शिरून रडावे असे त्याला वाटले. आपल्या मनाची आग शांत करण्याचे सामर्थ्य त्या थकल्या, क्षीण हातांशिवाय दुसऱ्या कशातही नाही असे त्याला वाटले. आणि त्या विचारांनी डोळ्याजवळ आलेले अश्रू ओघळून एकदम खाली आले. डोळ्यांतील अश्रू पुसून तो बाहेर दरवाज्यात येऊन उभा राहिला.

❖

[illegible] वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
[illegible] 2022 दिनांक १५/३/८२
विभाग बा.वा.
BVBK-0402922

# सुरेश एजन्सीची विज्ञानविषयक पुस्तके

---

**◻ कॉम्प्युटरचे रहस्य** — युनिक फिचर्स

(कॉम्प्युटर कसा चालतो, त्याचा उपयोग, कुठे कसा होतो, याविषयी सोप्या शब्दांत माहिती देणारे पुस्तक)

---

**◻ विज्ञानमहर्षी न्यूटन** — गजानन जोहारी

(जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ न्यूटनचे चित्तवेधक चरित्र)

---

**◻ विजेशी खेळणारा शास्त्रज्ञ चार्ल्स रुडॉल्फ** — सुधाकर प्रभु

(विज्ञानाच्या क्षेत्रात कुमारांच्या मनात प्रेरणा निर्माण करणारी एका शास्त्रज्ञाची विलक्षण जिद्दीची कथा)

---

**◻ परग्रहावर विजय** — वर्षा गजेंद्रगडकर

(वैज्ञानिक कादंबरी. परग्रहवासियांच्या आक्रमणाशी मानवाने दिलेल्या रोमहर्षक लढ्याची कहाणी)

---

सुरेश एजन्सी, पुणे